मानव विकास कार्यक्रम सन २०१८-१९ साठी लेखाशीर्ष “मागणी क्र.ओ-१, २०५३, (०४) आयुक्त, औरंगाबाद (०४) (०१) मानव विकास निर्देशांकात वृध्दी करणे (कार्यक्रम) या अंतर्गत, ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) (२०५३१२३१)” या खाली निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: माविका-२०१८/प्र.क्र.३७/का.१४१८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- २८ फेब्रुवारी, २०१९.

वाचा:

१) नियोजन विभाग, शासन निर्णय, क्रमांक:- माविमि-२०१०/प्र.क्र.८१/का.१४१८,दि.१९.०७.२०११
२) नियोजन विभाग, शासन ज्ञापन क्र.माविका-२०१८/प्र.क्र.३७/का.१४१८, दि.१८.०६.२०१८.
३) आयुक्त, मानव विकास यांचे पत्र क्र. २०१९/माविआ/अतिनि/कावि-८२, दि.२५.०२.२०१९.

शासन निर्णय:

नियोजन विभाग, शासन निर्णय संदर्भाधीन क्र.१ अन्वये मानव विकास कार्यक्रम राज्यातील २३ जिल्ह्यांतील १२५ तालुक्यांत आरोग्य,शिक्षण व उत्पन्न वाढ या क्षेत्रांशी संबंधित विविध लोकहिताच्या योजना राबविण्यात येत आहेत. नियोजन विभाग, शासन ज्ञापन संदर्भाधिन क्र.२ अन्वये मानव विकास कार्यक्रमांतर्गत सन २०१८-१९ या वर्षासाठी लेखाशीर्ष “मागणी क्र.ओ-१,२०५३, (०४) आयुक्त, औरंगाबाद, (०४) (०१) मानव विकास निर्देशांकात वृध्दी करणे (कार्यक्रम), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) (२०५३१२३१)” या खाली रु.२०३.०० कोटी इतका निधी २३ जिल्ह्यांना व आयुक्त मानव विकास यांना वितरीत करण्यात आलेला आहे.

२. आयुक्त मानव विकास यांनी संदर्भाधिन पत्र क्र.३ अन्वये मानव विकास कार्यक्रम अंतर्गत १२ जिल्ह्यातील कांमासाठी रु.१३.८१ कोटी इतक्या अतिरीक्त निधीची मागणी केलेली आहे.

३. मानव विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणी करिता सन २०१८-१९ या वर्षासाठी लेखाशीर्ष “मागणी क्र.ओ-१, २०५३, (०४) आयुक्त, औरंगाबाद, (०४) (०१) मानव विकास निर्देशांकात वृध्दी करणे (कार्यक्रम), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) (२०५३१२३१)” याखाली रु.१३,८०,९७,०००/- (रुपये तेरा कोटी ऐंशी लक्ष सत्त्याण्णव हजार फक्त) इतका निधी पुढील तक्त्यात दर्शविल्यानुसार “संबधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी” व “आयुक्त, मानव विकास आयुक्तालय” यांना वितरीत करण्यात येत आहे.

अ. क्र.	जिल्ह्याचे नांव	उपलब्ध करुन देण्यात येत असलेला निधी (रु.लाखात)
१	२	३
१	रायगड	१४.३१
२	नाशिक	२१०.९२
३	धुळे	२१८.०४
४	नांदेड	१५१.६७
५	यवतमाळ	५७.००
६	नागपूर	२९.५२
७	भंडारा	३.९५
८	गोंदिया	७४.७५
९	चंद्रपूर	२९१.२६
१०	गडचिरोली	२८३.५५
११	आयुक्त, मानव विकास, औरंगाबाद	४६.००
	एकूण	**१३८०.९७**

४. सदरहु निधी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात जिल्हाधिकारी यांनी आहरीत करावा व संबंधित जिल्हास्तरीय यंत्रणांना वितरीत करावा. मात्र त्याचा हिशोब तालुकानिहाय ठेवण्यात यावा. तसेच योजना राबवितांना संदर्भाधिन शासन निर्णयातील दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

५. वर नमुद केलेल्या लेखाशिर्षांतर्गत झालेला प्रत्यक्ष खर्च व प्रधान महालेखापाल कार्यालयाने नोंदविलेला खर्च याबाबत मेळ घालुन केलेल्या खर्चाचा अहवाल “आयुक्त, मानव विकास आयुक्तालय,औरंगाबाद” यांचेमार्फत शासनास पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत शासनास सादर करावा. संबंधीत जिल्हाधिकारी यांनी सदर निधीबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित कार्यान्वयन यंत्रणेकडुन घेऊन तात्काळ सादर करावीत.

६. नियोजन विभागाचा हा शासन निर्णय, महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) अधिनियम-२०१५ निधी वितरण या विषयी वित्त विभागाने निर्गमित केलेले शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२.०४.२०१८ मधील तरतूदी/निर्देशानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. नियोजन विभागाचा हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०२२८१५२१५७६२१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIJESING FATTESING VASAVE

Digitally signed by VIJESING FATTESING VASAVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5494d2ad3a3bc5ddd66daf9a8f17ceec5e2d7d4b6a8bba99c51d275801bcdf1b, cn=VIJESING FATTESING VASAVE
Date: 2019.02.28 16:20:31 +05'30'

(वि.फ. वसावे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपुर.
३) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
४) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-२, नागपुर.
५) आयुक्त, मानव विकास, बाबा पेट्रोल पंपाजवळ, अदालत रोड, औरंगाबाद.
६) संचालक ,लेखा व कोषागारे ,महाराष्ट्र शासन ,मुंबई.
७) जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष मानव विकास समिती, रायगड, नाशिक, धुळे, नांदेड, यवतमाळ, नागपुर, भंडारा, गोंदिया, चंद्रपुर व गडचिरोली.
८) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९) उपायुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, (नवी मुंबई , नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपुर)
१०) जिल्हा मानव विकास अधिकारी, जिल्हा मानव विकास समिती, रायगड, नाशिक, धुळे, नांदेड, यवतमाळ, नागपुर, भंडारा, गोंदिया, चंद्रपुर व गडचिरोली.
११) जिल्हा कोषागार अधिकारी ,औरंगाबादए रायगड, नाशिक, धुळे, नांदेड, यवतमाळ, नागपुर, भंडारा, गोंदिया, चंद्रपुर व गडचिरोली.
१२) निवडनस्ती /का-१४१८.